## अभिनेत्रीशी असभ्य वर्तन करणाऱ्याला जामीन

मुंबई : विमान प्रवासात अल्पवयीन अभिनेत्रीशी असभ्य वर्तन केल्याचा आरोप असलेल्या विकास सचदेवा याला बुधवारी अंधेरी न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला.आरोपी सचदेवा आणि त्याच्या कुटुंबीयांनी प्रसिद्धिमाध्यमे आणि सोशल मीडियावर प्रतिक्रिया व्यक्त करू नये, असेही निर्देश न्यायालयाने दिले. दिल्ली-मुंबई विमान प्रवासात आरोपीने आपल्याशी असभ्य वर्तन केले होते, असा व्हिडिओ अभिनेत्रीने प्रसारित केला होता. त्यानंतर पोलिसांनी याची दखल घेत आरोपीला अटक केली. न्यायालयाने २५ हजारांच्या जातमुचलक्यावर आरोपीला जामीन मंजूर केला.



# अॅग्रोवन स्मार्ट शेतकरी अॅवॉर्डचे वितरण २९ डिसेंबरला

## पुण्यात विशेष सोहळ्याचे आयोजन; राज्यभरातील अकरा पुरस्कार विजेत्या मान्यवरांचा होणार सन्मान

**सकाळ न्यूज नेटवर्क**

**पुणे, ता. २०** : 'अॅग्रोवन स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड'चे वितरण २९ डिसेंबर रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात केले जाणार आहे. राज्यभरातील अकरा पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे.

राज्यातील शेतकरी गेल्या काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्तींच्या अस्मानी आणि शेतकरीविरोधी धोरणांच्या सुलतानी संकटांचा सामना करत आहेत. याही परिस्थितीत अनेक शेतकरी कल्पकता, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर आव्हानांवर मात करण्याची धडपड करत आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवलेल्या शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली जावी आणि इतर शेतकऱ्यांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळावी, या हेतूने हे पुरस्कार दिले जातात. या उपक्रमासाठी सोनाई कॅटल फिड्स, यूपीएल, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि, स्मार्टकेम फर्टीलायझर्स लि. बँक ऑफ महाराष्ट्र, ओरियंटल इन्शुरन्स, चौधरी यात्रा कंपनी प्रा. लि यांचे प्रायोजकत्व लाभले आहे.

राज्यस्तरीय सहा व विभागीय पाच अशा एकूण अकरा गटांमध्ये हे पुरस्कार दिले जाणार आहेत. या पुरस्कारांसाठी राज्यभरातील शेतकऱ्यांमधून मोठा प्रतिसाद मिळाला. त्रयस्थ निवड समितीने त्यातून अकरा विजेत्यांची निवड केली आहे. आजपासून टप्प्याटप्प्याने पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा 'अॅग्रोवन'मधून केली जाणार आहे. या विजेत्यांच्या यशोगाथा आज (ता. २०) पासून प्रसिद्ध होत आहे. 'अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' या पुरस्काराची घोषणा मात्र २९ डिसेंबरच्या मुख्य समारंभात केली जाईल. महाराष्ट्रातील कृषी व ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा खास कार्यक्रम या प्रसंगी सादर केला जाणार आहे.

राज्य पातळीवरील 'अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' पुरस्कार मिळवणाऱ्या शेतकऱ्याला एक लाख रुपये, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. 'अॅग्रोवन प्रेरणा' आणि 'अॅग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी' पुरस्काराची रक्कम प्रत्येकी २५ हजार रुपये आहे, तर विभागीय पातळीवरील 'स्मार्ट शेतकरी' पुरस्कार तसेच सेंद्रिय शेती, कृषिपूरक व्यवसाय, कृषी उद्योजक पुरस्कार प्रत्येकी १० हजार रुपयांचा आहे. या विजेत्यांनाही सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे.

**अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्ड्स २०१७**

**पुरस्कार वितरण सोहळा**

- **तारीख : २९ डिसेंबर २०१७**
- **स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे**
- **वेळ : सायंकाळी ४ ते ७ वाजता**

## दृष्टिक्षेपात

### बडोद्यातील साहित्य संमेलनाला मोदींना आणण्यासाठी मोर्चेबांधणी

मुंबई, ता. २० : अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर राजकीय नेत्यांनी यावे की नाही, यावरून नेहमी वाद होतात. या पार्श्वभूमीवर गुजरातमधील बडोदा येथे होणाऱ्या ९१ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावे, यासाठी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. हे संमेलन १६ ते १८ फेब्रुवारीपर्यंत होणार आहे. संमेलनाला येणाऱ्या साहित्यिकांनी मानधनाची अपेक्षा ठेवू नये, या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. संमेलनासाठी पुरेसा निधी जमलेला नाही. गुजरातमध्ये भाजपचे नवे सरकार सत्तारूढ होत असून, या सरकारकडूनही अनुदान मिळावे, यासाठी आयोजक प्रयत्न करत आहेत. अशा वेळी पंतप्रधान मोदी यांना संमेलनाला आणण्यासाठी प्रयत्न सुरू असून, त्यासाठी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येत आहे. पंजाबमधील घुमान येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाला पंजाब सरकारने सढळ हस्ते मदत केली होती. त्यामुळे गुजरात सरकारकडूनही मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### शाळांच्या सहलींमागे आर्थिक हितसंबंध

मुंबई, ता. २० : शाळांतील मुलांच्या सहली ऐतिहासिक ठिकाणी न्याव्यात, या सरकारच्या अध्यादेशाला फाटा देत बहुतांश गेल्या काही वर्षांपासून शाळा विविध रिसॉर्टमध्ये सहली नेत आहेत. यातून शाळा आणि संबंधित रिसॉर्टचे आर्थिक हितसंबंध जपले जात असल्याबाबत टीचर्स डेमॉक्रॅटिक फ्रंट (टीडीएफ) या शिक्षक संघटनेने नाराजी दर्शवली आहे. डिसेंबर-जानेवारीत शाळांच्या सहली निघतात. मात्र आता या सहली केवळ रिसॉर्टमध्येच नेल्या जात आहेत. त्याच्या मोबदल्यात शिक्षकांना खास सवलतीही दिल्या जातात. या रिसॉर्टवर मुलांच्या संरक्षणाच्या उपाययोजना नसतात, असा आरोप करण्यात आला.

### गळफास घेऊन शेतकऱ्याची आत्महत्या

उमरगा, ता. २० : कर्जाला कंटाळून माडज (ता. उमरगा) येथील शेतकरी सचिन अंकुश फुगटे (वय २३) याने मंगळवारी (ता. १९) रात्री उशिरा शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. सचिन याचे वडील अंकुश फुगटे यांच्या नावावर बँकेचे एक लाखाचे कर्ज आहे, तर सचिनच्या नावे ४० हजारांचे कर्ज आहे. शेतात काम करीत असताना बैलाने मारल्याने जखमी झालेल्या सचिनवर गेल्या वर्षापासून उपचार सुरू होते. हलाखीच्या स्थितीत उपचारांसाठी होत असलेल्या हजारो रुपयांच्या खर्चामुळे तो खचला होता. उपचारासाठी आणखी पैशांची गरज होती. त्यातच सततची नापिकी, थकीत कर्ज या विवंचनेतून सचिनने आत्महत्या केली.

# 'काश्मीर'वर बोलण्याचा सईदला हक्क

## लष्करप्रमुख बाज्वा यांचे बेताल वक्तव्य

**इस्लामाबाद, ता. २० (वृत्तसंस्था)** : मुंबईवरील २६/११च्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड हाफिज सईद याची पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल कमार जावेद बाज्वा यांनी आज जोरदार पाठराखण केली. काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी सईद हा महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असे स्पष्ट करत बाज्वा म्हणाले, की प्रत्येक पाकिस्तानी नागरिकाप्रमाणे काश्मीरचा मुद्दा उपस्थित करण्याचा त्याला हक्क आहे.

पाकिस्तानी संसदेच्या एका समितीसमोर बाज्वा यांनी आज परराष्ट्र धोरण, दहशतवादाच्या विरोधातील लढाई अशा अनेक मुद्द्यांवर मते मांडली. या वेळी बाज्वा यांनी सईद संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना वरील धक्कादायक विधाने केली. प्रत्येक पाकिस्तानी नागरिकाप्रमाणे काश्मीरचा मुद्दा उपस्थित करण्याचा सईदला हक्क आहे. काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी तो महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो, असे बाज्वा म्हणाले. या वेळी बाज्वा यांनी सईदची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानचे माजी लष्करशहा परवेझ मुशर्रफ यांनी आगामी निवडणुकीसाठी सईदच्या जमात उद दवा (जेयूडी) या संघटनेशी आघाडी करण्याचे संकेत काही दिवसांपूर्वीच दिले होते. त्या पार्श्वभूमीवर बाज्वा यांच्या वक्तव्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### सईदप्रकरणी अमेरिकेला चिंता

वॉशिंग्टन, ता. २० (पीटीआय) : मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड हाफिज सईद याने पाकिस्तानात होणारी २०१८ची सार्वत्रिक निवडणूक लढविण्याची घोषणा केली असून, ही अतिशय गंभीर बाब आहे. या घडामोडींबाबत आम्हाला चिंता वाटते आहे, अशी प्रतिक्रिया अमेरिकेने व्यक्त केली. जमात उद दवा या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेला सईद हा पाकिस्तानात खुलेआम फिरत असल्याबद्दलही अमेरिकेने नाराजी व्यक्त केली आहे. दहशतवादी कारवाया केल्याबद्दल सईदच्या डोक्यावर अमेरिकेने एक कोटी डॉलरचे बक्षीस ठेवले आहे.

तय्बा तोयबाचाही संस्थापक असलेल्या सईदने निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. मिल्ली मुस्लिम लीग पक्षाकडून निवडणूक लढविणार असल्याचे सईदने म्हटले असले, तरी या पक्षाची अद्याप निवडणूक आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेली नाही. तो पाकिस्तानात मोकाट फिरत असून, त्याने निवडणूक लढविण्याची घोषणा करणे या घडामोडी चिंताजनक आहेत, असे मत अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने व्यक्त केले.

# मुख्यमंत्र्यांवर शिवसेनेचा हल्लाबोल

## कोकणातील नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पावरून भाजप-शिवसेनेमध्ये जुंपली

**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. २० : कोकणातील प्रस्तावित नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पावरून भाजप आणि शिवसेनेमध्ये चांगलीच जुंपली आहे. या प्रकल्पाला ठाम विरोध व्यक्त करण्यासाठी शिवसेनेकडून केंद्रीय मंत्री अनंत गीते आणि कोकणातील खासदार विनायक राऊत पुढे सरसावले आहेत. प्रकल्पाच्या पाठिंब्याबाबतचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान धादांत खोटे आणि दिशाभूल करणारे आहे, असा हल्ला चढवतानाच, हा प्रकल्प रद्द व्हावा, अशी मागणी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे शिवसेनेने केली आहे.

'नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाला शिवसेनेचा विरोध नसून, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गीते यांनी प्रकल्पासाठी आग्रह धरला होता' या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कथित विधानावरून गीते यांनी आज दिल्लीत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. ''मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिवसेनेच्या पाठिंब्याचे केलेले विधान धादांत खोटे आणि दिशाभूल करणारे आहे. आपली मुख्यमंत्र्यांशी कधीही चर्चा किंवा भेट झाली नाही. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीच स्वतः प्रकल्पाच्या विरोधाची घोषणा केली आहे. असे असताना मुख्यमंत्री असे का बोलले याचे आश्चर्य वाटते,'' असा हल्ला गीते यांनी आज चढविला.

जैतापूर अणूउर्जा प्रकल्पाजवळच हा तेलशुद्धीकरण प्रकल्प उभारून स्मशानघाट बनविण्याचा प्रकार आहे, असा आरोप खासदार विनायक राऊत यांनी केला. मुख्यमंत्र्यांच्या विधानामागे आंदोलन करणारे ग्रामस्थ आणि शिवसेना यांच्यात फूट पाडण्याचा कुटील डाव असल्याचा आरोपही राऊत यांनी केला.

# नितीन आगे हत्येप्रकरणी जनहित याचिका निकाली

**औरंगाबाद, ता. २०** : राज्यभर गाजलेल्या खर्डा (ता. जामखेड, जि. नगर) येथील नितीन आगे हत्या प्रकरणातील दहा आरोपींची पुराव्याअभावी नगर जिल्हा व सत्र न्यायालयाने निर्दोष सुटका केली होती. या निर्णयाविरुद्ध सामाजिक कार्यकर्ते संजय रमेश भालेराव यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या फौजदारी जनहित याचिकेमधील मुद्दे हे शासनातर्फे दाखल करण्यात येत असलेल्या अपिलामध्ये समाविष्ट असल्याने याचिकेचा उद्देश सफल झाल्यामुळे ती निकाली काढण्याचा आदेश खंडपीठाने दिला.

बारावीत शिकत असलेल्या नितीन आगे याची २८ एप्रिल २०१४ रोजी हत्या झाली होती. आरोपींच्या निर्दोष मुक्ततेला आव्हान देणारी जनहित याचिका सामाजिक कार्यकर्ते भालेराव यांनी खंडपीठात दाखल केली होती.

# भारतीय विद्यार्थ्यांना मिळेनात घरचे खाद्यपदार्थ

## जपान, सिंगापूर, आखाती देशांमध्ये गैरसोयी

**विनोद बेदरकर** : सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता.२० : साता-समुद्रापलीकडे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतीय खाद्यपदार्थ पाठवण्याची प्रक्रिया किचकट झाली आहे. त्यामध्ये जपान, सिंगापूर, इंडोनेशिया अन् काही आखाती देशांचा समावेश आहे. तिथल्या यंत्रणांकडून पार्सल स्वीकारण्यात अडचणी उभ्या केल्या जात असल्याने विद्यार्थ्यांच्या गैरसोयीत भर पडत आहे. खाद्यपदार्थ पाठविण्यासाठी पाच डिसेंबरपासून अडचणी येऊ लागल्या आहेत, असा पालकांचा अनुभव आहे.

शिक्षण, रोजगारासाठी विदेशात जाणाऱ्यांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांचा क्रमांक वरचा आहे. 'ऑर्गनायजेशन ऑफ इकॉनॉमिक्स अॅण्ड डेव्हलपमेंट'च्या (ओईसीडी) च्या सर्वेक्षणानुसार विदेशात शिक्षणासाठी गेलेल्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या १ लाख ३० हजारांहून अधिक आहे. आता शिक्षण अन् रोजगार मिळून २ लाख ४० हजारांच्या आसपास ही संख्या आहे. विद्यार्थ्यांना विदेशी खाद्य पदार्थांशी जुळवून घेण्याच्या अडचणीवर तोडगा म्हणून भारतातून चिवडा, चकल्या, लाडू, लोणचे असे दीर्घकाळ टिकणारे पदार्थ पाठवले जातात. आर्थिकदृष्ट्या स्वस्त आणि आरोग्य अशा दोन्ही अर्थाने भारतीय फराळ विद्यार्थ्यांना हवाहवासा वाटतो. अनेक पालकांनी सुरक्षेच्या आणि किचकट नियमांमुळे खाद्यपदार्थ तेथे पडून राहण्यापेक्षा परत मागविले आहेत.

### 'सीना-माढा' योजनेचे वीजबिल दोन कोटी!

**सोलापूर, ता. २०** : सीना-माढा उपसा सिंचन योजनेकडे महावितरणची दोन कोटी दोन लाख रुपयांची थकबाकी आहे. ही थकबाकी भरण्यासाठी महाविरणने एक महिन्याची मुदत दिली आहे. यामध्ये विजेचे बिल न भरल्यास वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित केला जाईल, असेही महावितरणने पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे. महावितरणकडून उच्चदाब वाहिनीच्या माध्यमातून यांना वीजपुरवठा केला जातो. थकबाकी न भरल्यामुळे महावितरणने १३ सप्टेंबरपासून या योजनेचा वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरूपात खंडित केला आहे.

# 'द्रुतगती'वरील अपघातात तिघे ठार; सात जखमी

**खोपोली, ता. २०** : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खोपोलीनजीक टायर फुटल्याने नियंत्रणाबाहेर गेलेली इनोव्हा मोटार बॅरियर्स ओलांडून विरुद्ध दिशेच्या लेनवरून जाणाऱ्या रिट्झ मोटारीला धडकल्यामुळे झालेल्या भीषण अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाले. जखमींमध्ये तिघांची प्रकृती चिंताजनक आहे.

खोपोलीनजीकच्या अॅडलॅब इमॅजिका पार्ककडे इनोव्हा मोटारीतून नऊ जण जात होते. खालापूर टोल प्लाझाजवळ पहिल्या लेनमधून जाणाऱ्या या मोटारीचा मागील टायर फुटला. त्यामुळे गाडीला अचानक ब्रेक लागून गाडी उलटून बॅरियर्सना तोडून विरुद्ध दिशेच्या लेनवर गेली. त्याचवेळी पुण्याकडून मुंबईकडे भरधाव रिट्झ मोटार जात होती. या रिट्झ गाडीवर इनोव्हा आदळली. त्यात रिट्झमधील अनंत नरेंद्र पारीख (वय ५५, रा. पुणे) यांचा मृत्यू झाला, तर इनोव्हा मोटारीतील अस्मित तावडे (१९, रा. घाटकोपर) आणि शुभम बोराडे (१९, रा. विक्रोळी) हे मृत्युमुखी पडले.

वायर बॅरियर अपघातानंतर उखडून पडलेले आढळले. काही वर्षांपूर्वी एका अभिनेत्याच्या अपघाती मृत्यूनंतर युद्धपातळीवर अशा प्रकारचे बॅरियर्स बसवण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने घेतला होता; परंतु त्यामुळे अपघातांची संख्या घटलेली नाही.

### माणुसकी हरवली

**या भीषण अपघातानंतर मार्गावर रक्ताचा सडा पडला होता, तर मोटारीत तडफडत असलेल्यांना मदतीचा हात पुढे करण्याऐवजी अनेक जण छायाचित्रे व व्हिडिओ काढण्यातच व्यस्त होते.**



मुंबई : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर झालेल्या भीषण अपघातानंतर मोटारीची झालेली अवस्था.

**शिक्षक पाहिजेत**

**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या, मेस्को एन्टरप्रायझेस, पोवई नाका, सातारा येथे कंम्प्युटर ट्रेनिंग सेंटरसाठी Tally, MSCIT, Programming कोर्स शिकविण्यासाठी अनुभवी शिक्षक पाहिजे. आपला बायोडेटासह शैक्षणिक कागदपत्रे २७ डिसेंबर २०१७ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवेत.**

**संपर्क - मेस्को एंटरप्रायझेस, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बेसमेंट, तहसिलदार कार्यालया शेजारी, पोवई नाका, सातारा - ४१५००१**
**मो. ९४२०६९७८०७ / ८२७५९१०५४८**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**कुलसचिव आणि वित्त व लेखा अधिकारी पदे भरण्याबाबत**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील कुलसचिव आणि वित्त व लेखा अधिकारी पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात **गुरुवार, दिनांक २१-१२-२०१७ ते बुधवार, दिनांक १०-०१-२०१८** या कालावधीमध्ये ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. शैक्षणिक अर्हता व इतर सर्व तदनुषंगिक माहिती विद्यापीठाच्या **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जाहिरात क्र. ५८
दिनांक : २१-१२-२०१७

**(डॉ. अरविंद शाळिग्राम)**
प्रभारी कुलसचिव

**बोरोप्लस**

**एक क्रीम, जे सर्व क्रीमचे काम करतो**

**कोल्ड क्रीम+ पेक्षा उत्तम, पेट्रोलियम जेली+ पेक्षा ही उत्तम**

बोरोप्लस, कोल्ड क्रीम पेक्षा जास्त मॉयश्चाराइजेशन आणि पेट्रोलियम जेली पेक्षा जास्त सुरक्षा देते. ही एकटीच विंटर क्रीम, लोशन, नाईट क्रीम, एंटीसेप्टिक क्रीम, फूट क्रीम आणि लिप बाम सारखे काम करते. हीचे एंटीसेप्टिक गुण डाग मिटवण्यास मदत करते. यामध्ये आहे तुळशी, चन्दन, हळद, कडुलिंब, एलोवेरा, सारखी वन-औषधी, जी त्वचेमध्ये खोलवर जाऊन तीला देते जास्त ओलावा, सुरक्षा आणि जागवते स्वस्थ दमदार पणा.

